॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com
अहिल्यानगर | गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक २४५ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

*** सुविचार ***
कल्पना आपल्या स्वप्नांवर राज्य करतात.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### बळीराजा

शेतकऱ्यांच्या मरणाला
व्यवस्थाच देते खांदा
अमाप खर्च करून जेव्हा
कवडीमोल होतो कांदा
अर्थव्यवस्था उभी आहे
फक्त शेतकऱ्यांनाच गाडून
पीक आले हातात की
मग देतात भाव पाडून

## SPOT NEWS

### 'ई-केवायसी'साठी उरला शेवटचा दिवस

● **मुंबई** – मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी करण्याची अंतिम मुदत ३० एप्रिल रोजी संपणार आहे, त्यामुळे लाभार्थी महिलांकडे एकच दिवस शिल्लक आहे. पुणे जिल्ह्यात या योजनेला सर्वाधिक प्रतिसाद मिळाला असून, तब्बल २१ लाखांहून अधिक महिला पात्र लाभार्थी म्हणून नोंदल्या गेल्या आहेत; परंतु तांत्रिक अडचणी, चुकीची माहिती आणि पडताळणी प्रक्रियेमुळे हजारो महिलांचे अर्ज अद्याप प्रलंबित आहेत. जिल्ह्यात पोर्टलवर प्राप्त अर्जांची संख्या ११ लाख २४ हजार ९२० असून, 'नारीशक्ती'अंतर्गत ९ लाख ७६ हजार ६६० महिलांची नोंद आहे. अशी जिल्ह्यातील एकूण पात्र लाभार्थी संख्या २१ लाख १ हजार ५८० असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. राज्यात पोर्टलवर प्राप्त अर्जांची संख्या १ कोटी १२ लाख ७० हजार २६१ आहे आणि त्यापैकी १ कोटी ६ लाख ६९ हजार १३९ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. योजनेच्या निकषात न बसणाऱ्या लाभार्थ्यांची छाननी प्रशासनाने सुरू केली आहे.

### हैदराबादचा मुंबईवर दणदणीत विजय

● **मुंबई** – आयपीएलच्या सध्या सुरू असलेल्या हंगामात मुंबई इंडियन्सला आपल्या सहाव्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. बुधवारी, सनरायझर्स हैदराबादने त्यांचा ६ गडी राखून पराभव केला. वानखेडे स्टेडियमवर, हैदराबादने ४ गडी गमावून १८.४ षटकांत २४४ धावांचे लक्ष्य यशस्वीरित्या गाठले. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना, मुंबईने २० षटकांत ५ गडी गमावून एकूण २४३ धावा उभारल्या होत्या. मुंबईकडून डावाची सुरुवात करताना, रायन रिकलटनने शतकी खेळीचा एक अप्रतिम नमुना पेश केला; त्याने अवघ्या ५५ चेंडूंमध्ये नाबाद १२३ धावा कुटल्या.

# एआयच्या विश्वात महाराष्ट्राचे महत्वाकांक्षी पाऊल

## राज्याचे कृत्रिम बुद्धिमता धोरण जाहीर । ५ वर्षात १० हजार कोटींची गुंतवणूक आणि दीड लाख रोजगाराचे ध्येय

● **मुंबई । वीरभूमी** –
एआयच्या वाढत्या वापरामुळे जगभरात बेकारीचे संकट घोंगावत असताना राज्य सरकारने मात्र एआय धोरणातून रोजगार निर्मिती करण्याचा संकल्प सोडला आहे. राज्यातील उद्योग, प्रशासन आणि सार्वजनिक सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) व्यापक वापर वाढविण्यासाठी बुधवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत 'महाराष्ट्र एआय धोरण-२०२६' जाहीर करण्यात आले. पुढील पाच वर्षात म्हणजे २०३१ पर्यंत १० हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि दीड लाखांहून अधिक रोजगार निर्माण करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.



जागतिक पातळीवर कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अनेक देशांची स्पर्धा सुरु असताना महाराष्ट्राने 'नैतिक आणि सर्वसमावेशक कृत्रिम बुद्धिमत्ता विकासाचे राष्ट्रीय केंद्र' ही आपली ओळख निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यासाठी 'महाराष्ट्र एआय मिशन' स्थापन करण्याचा प्रस्ताव या धोरणात मांडण्यात आला आहे. राज्यातील दोन लाख युवक आणि व्यावसायिकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे कौशल्य प्रशिक्षण देण्याची योजनाही यात अंतर्भूत आहे.

हे धोरण सात आधारस्तंभांवर उभारण्यात आले आहे. पहिला आणि सर्वात महत्त्वाचा स्तंभ म्हणजे राज्यव्यापी एआय पायाभूत सुविधांचा विकास. यात किमान दोन हजार जीपीयू संगणन क्षमता उपलब्ध करणे आणि 'कम्प्युट ॲज अ सर्व्हिस' या संकल्पनेतून शासकीय विभागांनाही या सुविधा वापरता येतील, अशी यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. पाच नवोन्मेष क्षेत्रांमध्ये एआय शहरेही विकसित केली जाणार आहेत. दुसरा महत्त्वाचा स्तंभ म्हणजे स्थानिक डेटाचा वापर. मराठी भाषेसह प्रादेशिक बोलीभाषा आणि आदिवासी भाषांचे डेटासेट्स तयार करणे आणि 'स्टेट एआय डेटा एक्सचेंज' स्थापन करणे, हे या भागाचे वैशिष्ट्य असेल. केंद्र सरकारच्या 'एआय कोष' व्यासपीठाशी राज्याची यंत्रणा जोडली जाणार आहे. तिसऱ्या स्तंभात 'महाराष्ट्र प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण केंद्र' स्थापन करण्याची योजना आहे. उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्या दुहेरी भागीदारीतून हे केंद्र कार्य करेल.

राज्यातील उद्योग, प्रशासन आणि सार्वजनिक सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) व्यापक वापर वाढविण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत 'महाराष्ट्र एआय धोरण-२०२६' जाहीर करण्यात आले.

या धोरणांतर्गत राज्यभरात बारा एआय इनक्युबेटर्स उभारले जातील. प्रत्येक स्टार्टअपला एक कोटी रुपयांपर्यंत अनुदान मिळणार असून महिला नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना १ कोटी २५ लाखांपर्यंत आणि पंचवीस टक्के अतिरिक्त आर्थिक सहाय्य दिले जाईल. सहाव्या स्तंभांतर्गत आरोग्य, कृषी, शिक्षण, नगर विकास, मराठी भाषा-संस्कृती आणि वित्त-महसूल या सहा क्षेत्रांत उत्कृष्टता केंद्रे स्थापन केली जातील. सातव्या आणि अंतिम स्तंभात नैतिक एआय वापरासाठी कायमस्वरूपी आराखडा तयार केला जाईल आणि प्रत्येक शासकीय विभागात वार्षिक एआय सज्जता लेखापरीक्षण बंधनकारक केले जाईल.

उद्योगांना आकर्षित करण्यासाठी धोरणात भरीव आर्थिक सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. स्थिर भांडवली गुंतवणुकीवर कमाल वीस टक्के भांडवली अनुदान, शंभर टक्के मुद्रांक शुल्क माफी, दहा वर्षांपर्यंत प्रति युनिट दोन रुपये वीज दर अनुदान, देशांतर्गत पेटंटसाठी आठ लाख आणि आंतरराष्ट्रीय पेटंटसाठी दहा लाख रुपयांपर्यंत खर्च परतावा तसेच पंचवीस लाखांपर्यंत प्रमाणन खर्च परतावा अशा सवलती यात अंतर्भूत आहेत. आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये सहभागी होणाऱ्या उद्योगांना २५ लाखांपर्यंत भाडे परतावाही दिला जाणार आहे. यामुळे महाराष्ट्राचे एआयच्या विश्वात महाराष्ट्राचे महत्वाकांक्षी पाऊल टाकले जाणार आहे.

### स्टार्टअप आणि लघुउद्योगांसाठी तरतूद

■ लघु आणि मध्यम उद्योगांना एआय क्षेत्रात आणण्यासाठी धोरणात विशेष तरतूद आहे. पाच हजार लघु आणि मध्यम उद्योगांना एआय अंमलबजावणी खर्चावर वीस टक्के अनुदान दिले जाणार असून 'महा एआय टूल्स हब' हे केंद्रीय व्यासपीठ स्थापन केले जाणार आहे. स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा समर्पित 'एआय स्टार्टअप व्हेंचर फंड' उभारण्यात येणार असून त्यात राज्य सरकारचे २५० कोटी आणि उद्योग क्षेत्राचे २५० कोटी असे योगदान अपेक्षित आहे.

## रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी १५ ऑगस्टपर्यंतची मुदत

● **मुंबई । वीरभूमी** –
राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयावर राज्य सरकारने आता ठोस पाऊल उचलले आहे. परप्रांतीय चालक आणि विविध संघटनांनी केलेल्या मागणीचा विचार करून, सरकारने चालकांना मराठी शिकण्यासाठी १५ ऑगस्ट २०२६ पर्यंतची मुदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आजच्या कॅबिनेट बैठकीत घेतला आहे.

कॅबिनेट बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या निर्णयाची सविस्तर माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की, केवळ सक्ती न करता चालकांना ही भाषा आत्मसात करता यावी यासाठी सरकार सर्वतोपरी मदत करणार आहे. १ मे ते १५ ऑगस्ट या कालावधीत चालकांना मराठी भाषेचे प्राथमिक ज्ञान अवगत करावे लागेल. चालकांसाठी विशेष 'मराठी शिक्षण पुस्तिका' तयार करण्यात आली आहे. ही पुस्तिका राज्यातील सर्व आरटीओ कार्यालयांमध्ये उपलब्ध असेल. ही पुस्तिका मोबाईलवरही पाहता येईल. विशेष म्हणजे, यामध्ये टठ कोड देण्यात आला असून त्याद्वारे चालक ऑडिओ स्वरूपात उच्चार आणि संवाद ऐकू शकतील. या पुस्तिकेत प्रवाशांशी संवाद साधण्यासाठी आवश्यक असलेली महत्त्वाची १५ ते १६ वाक्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.

ज्या रिक्षा-टॅक्सी संघटनांनी मराठी शिकण्यासाठी वेळ मागितला होता, त्यांना आता सरकारने संधी दिली आहे. संघटनांनी स्वतःहून पुढाकार घेत आपल्या कार्यालयांत किंवा शाखांमध्ये चालकांसाठी मराठीचे वर्ग भरवावेत, असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केले आहे.

या निर्णयामुळे आता मुंबई, पुणे यांसारख्या शहरांतील हिंदी भाषिक चालकांना मराठी भाषेचे धडे गिरवावे लागणार आहेत. १५ ऑगस्टनंतर या संदर्भात काय भूमिका घेतली जाते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उद्धव ठाकरेंकडून अंबादास दानवेंना उमेदवारी

● **मुंबई । वीरभूमी** –
विधानपरिषदेच्या निवडणुकीमुळे सध्या राज्यात राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. भाजपाने नुकतेच आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. भाजपाने यावेळी नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे दुसरीकडे महाविकास आघाडीकडून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीच उमेदवारी अर्ज दाखल करावा, यासाठी प्रयत्न केला जात होता.

शरद पवार यांच्या पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे पाटील, काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रत्यक्ष ठाकरे यांनीच उमेदवार राहावे यासाठी प्रयत्न केले होते. परंतु आता ठाकरे गटाने ऐनवेळी विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेत अंबादास दावने यांना तिकीट दिले आहे. त्यानंतर आता खासदार संजय राऊत यांनी एक ट्वीट केले आहे.

ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आमच्या पक्षाकडून तसेच महाविकास आघाडीचे विधानपरिषदेच्या निवडणुकीचे उमेदवार अंबादस दानवे हेच असतील, असे जाहीर केले. त्यानंतर लगेच संजय राऊत यांनी आपल्या सोशल मीडियावर एक ट्वीट केले आहे. या ट्वीटमध्ये त्यांनी अंबादास दानवे यांच्या उमेदवारीविषयी भाष्य केले. 'अंबादास दानवे हे शिवसेनेचे म्हणजेच महाविकास आघाडीचे विधान परिषदेचे उमेदवार असतील. उद्या ११ वाजता ते उमेदवारी अर्ज दाखल करतील. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दानवे यांच्या नावाची घोषणा केली आहे,' असे संजय राऊत आपल्या ट्वीटमध्ये म्हणाले आहेत.

दरम्यान, अंबादास दानवे यांच्या नावाची घोषणा होताच काँग्रेसने आपली वेगळी चूल मांडण्याची भूमिका घेतली आहे. ठाकरे यांच्या शिवसेनेने अंबादास दानवे यांना तिकीट दिले असले तर आम्ही काँग्रेसकडून आमचा उमेदवार देणार आहोत. पक्षश्रेष्ठीशी चर्चा करून आम्ही त्याबाबत निर्णय घेऊ, अशी भूमिका काँग्रेसने घेतली आहे. त्यामुळे आता नेमकं काय होणार? महाविकास आघाडीत काँग्रेसची मनधरणी कशी केली जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## दाक्षिणात्य सुपरस्टार थलपती विजय यांचे साईबाबांकडे विजयासाठी साकडे

● **शिर्डी । वीरभूमी** –
तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीनंतर आता सर्वांचे लक्ष ४ मे रोजी लागणाऱ्या निकालांकडे आहे. या निकालांच्या पार्श्वभूमीवर, दाक्षिणात्य सुपरस्टार आणि 'तमिलगा वेत्री कळघम' पक्षाचे अध्यक्ष थलपती विजय यांनी बुधवारी शिर्डीत येऊन श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

अभिनेता विजय यांचा राजकारणातील हा पहिलाच मोठा प्रवेश असून, त्यांच्या पक्षाने यंदाची विधानसभा निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढवली आहे. निवडणुकीचा निकाल जाहीर होण्यास अवघे काही दिवस उरले असताना, विजय यांनी साईबाबांच्या दरबारी हजेरी लावली. यावेळी त्यांनी बाबांच्या समाधीवर मस्तक टेकवून आशीर्वाद घेतले आणि विजयासाठी साकडे घातले.

विजय यांच्या शिर्डी भेटीमुळे मंदिर परिसरात त्यांच्या चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी विजय यांचा शाल आणि साईबाबांची मूर्ती देऊन सत्कार केला. यावेळी संस्थानचे इतर पदाधिकारीही उपस्थित होते.

तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडली असून ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. एक्झिट पोल्समध्ये विजय यांच्या पक्षाला चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत असल्याने, या निकालांकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. राजकीय तणावाच्या वातावरणातून ब्रेक घेत विजय यांनी घेतलेला हा 'आध्यात्मिक आधार' सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे.



SPOT NEWS

## कस्टोडियल टॉर्चरप्रकरणी कठोर कारवाईसाठी मागणी : सराफ संघटना

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

कोतवाली पोलीस ठाण्यात घडलेल्या कथित कस्टोडियल टॉर्चर, बेकायदेशीर ताबा, अमानुष मारहाण व खंडणी प्रकरणी दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी कारवाई करावी, या मागणीसाठी सराफ सुवर्णकार संरक्षण समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन व उपोषण सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष काकासाहेब बोऱ्हाडे, अध्यक्ष उमेश बुऱ्हाडे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष गणेश टाक, संपर्कप्रमुख अतुल पंडित यांच्यासह उमेश बागडे, ओंकार गडगिळे, अक्षयनाथ शहाणे, अमोल रायमोकर, लक्ष्मण दहिवाळ, गजानन शहाणे, गणेश मैड, दिलीप सिदवाडकर, प्रथमेश नगरकर, श्रीनिवास इंदपूर आदींसह राज्यभरातील सुवर्णकार व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार, १६ एप्रिल २०२६ रोजी कोतवाली पोलीस ठाणे, अहिल्यानगर येथे अत्यंत गंभीर घटना घडली. बोधेगाव (ता. शेवगाव) येथील सराफ व्यावसायिक भागवत अदापुरे यांना कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न पाळता दुकानातून जबरदस्तीने ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्यांना वाहनात तसेच पोलीस ठाण्यात अमानुष मारहाण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेला विरोध करण्यासाठी आलेल्या नातेवाईक व समिती सदस्यांनाही पोलीस ठाण्यातच मारहाण करून बेकायदेशीर ताब्यात ठेवण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. संघटनेच्या मते, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे तसेच शासनाच्या जीआरमधील मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केले.

# विवेक कोल्हे समर्थकांकडून कोपरगावात दिवाळी साजरी

### विधानपरिषदेसाठी घोषणा होताच समर्थकांचा जल्लोष । निष्ठेचे फळ मिळाल्याने कार्यकर्त्यानकडून समाधान

**कोपरगाव । वीरभूमी –**

युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांना राज्याच्या विधान परिषदेसाठी भाजपाकडून उमेदवारी जाहीर असून या ऐतिहासिक निवडीबद्दल कोपरगाव मतदारसंघात विविध ठिकाणी मोठा जल्लोष साजरा करण्यात आला. भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी युवा नेते विवेकभैय्या कोल्हे तसेच कोल्हे कुटुंबाच्या निष्ठेची दखल घेतली असून विवेक कोल्हे यांना विधान परिषदेची उमेदवारी दिल्याने योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. विवेकभैय्या कोल्हेंसारख्या युवा व अभ्यासू नेतृत्वाला विधान परिषदेवर काम करण्याची संधी मिळाल्यामुळे सर्वत्र आनंद व्यक्त होत असून या नव्या समीकरणामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शहा आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, व कोअर कमिटी यांनी कोल्हे कुटुंबावर मोठा विश्वास दाखवत विधानपरिषदेची उमेदवारी युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांना दिली आहे. दोन वर्षांपूर्वी कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षश्रेष्ठींनी विवेकभैय्या कोल्हे यांना दिल्लीला बोलावून महायुतीसाठी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेत त्यांच्या पुढील राजकीय भवितव्यासाठी ठाम पाठीशी उभे राहण्याचे संकेत दिले होते.

यावेळी भाजपाच्या मा.आ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी देशाचे सहकार मंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भाजपाच्या पक्षश्रेष्ठींच्या भूमिकेचा आदर करून २०२४ ची विधानसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता. निवडणूक न लढवूनही त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या उन्नतीसाठी सातत्याने पुढाकार घेत पक्षासाठी उल्लेखनीय कामगिरी केली. तीन महिन्यांपूर्वी पार पडलेल्या कोपरगाव नगरपालिकेच्या निवडणुकीत दैदीप्यमान यश संपादन करत त्यांनी आपल्या नेतृत्वाची छाप संपूर्ण महाराष्ट्रात उमटवली आहे. तसेच भारतीय जनता पार्टीच्या उन्नतीसाठी मेहनत घेतली.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी कोपरगाव येथे पार पडलेल्या देशातील पहिल्या सीबीजी प्रकल्पाच्या उद्घाटनावेळी देशाचे सहकार मंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला होता. त्यावेळी प्रमुख नेत्यांनी विवेकभैय्या कोल्हे यांना पक्षाकडून योग्य वेळी संधी दिली जाईल, असे संकेत दिले होते. त्यानुसार भाजपाने दिलेला शब्द पूर्ण करत नुकतीच युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांची विधान परिषदेच्या सदस्यपदासाठी उमेदवारी जाहीर केली आहे. विवेक कोल्हे यांना विधानपरिषदेवर नियुक्त केल्यामुळे कोपरगाव मतदार संघामध्ये आनंदाची लाट पसरलेली आहे.या पार्श्वभूमीवर संपूर्ण कोपरगाव तालुक्यात तसेच मतदारसंघातील विविध भागांमध्ये भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, मिठाई वाटून जल्लोष साजरा केला.अनेक ठिकाणी फ्लेक्स झळकले दिवाळीप्रमाणे आनंदोत्सव साजरा होत असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अमली पदार्थांविरोधात कठोर कारवाई करा

### निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते । जिल्हास्तरीय नार्को को-ऑर्डिनेशन सेंटर समितीची बैठक

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्ह्यात अमली पदार्थांची विक्री, साठा व तस्करीवर कठोर भूमिका घेऊन कारवाई करावी, तसेच अमली पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय नार्को को-ऑर्डिनेशन सेंटर समितीच्या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गिते बोलत होते. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक हरिष भोये यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गिते म्हणाले, शाळा व महाविद्यालये तसेच गर्दीच्या ठिकाणी पथनाट्यांच्या माध्यमातून जनजागृती अभियान राबवण्यावर भर देण्यात यावा. ड्रग्स डिटेक्शन किट्स व टेस्टिंग केमिकल्सची उपलब्धता सुनिश्चित करून तपास यंत्रणेला अधिक बळकटी देण्यात यावी. पोलीस विभाग, एनसीबी व राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या कारवाईची माहिती एकत्रित करून अद्ययावत डेटाबेस तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यात १ जानेवारी ते २८ एप्रिल २०२६ दरम्यान अमली पदार्थ बाळगणाऱ्या ९ प्रकरणांमध्ये १२ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लागवडीच्या प्रकरणातील २ गुन्ह्यांमध्ये ३ व्यक्तींवर, वाहतुकीसंदर्भातील ३ प्रकरणांमध्ये ८ व्यक्तींवर आणि अमली पदार्थ सेवनाच्या २६ प्रकरणांमध्ये ३२ व्यक्तींवर, अशा प्रकारे अमली पदार्थांच्या एकूण ४० प्रकरणांमध्ये ५५ व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याची माहिती श्री. भोये यांनी यावेळी दिली.

# श्रीगोंद्यात छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समितीची कोअर कमिटी जाहीर

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती २०२६ ची महत्वपूर्ण कोअर कमिटी बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत सर्वानुमते समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी माजी उपनगराध्यक्ष राजू गोरे यांची निवड करण्यात आली असून, उपाध्यक्षपदी विजय डहाळे, सचिवपदी आदित्य लोखंडे तर खजिनदारपदी शेखर मखरे यांची निवड करण्यात आली आहे.



बैठकीदरम्यान आगामी जयंती उत्सवानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. प्रत्येक जबाबदारी निश्चित करताना उत्सव अधिक संघटित आणि प्रभावी करण्यावर भर देण्यात आला. तसेच या जयंती उत्सवात सर्व समाजघटकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करून सामाजिक ऐक्य आणि एकात्मतेचा संदेश देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शाम जरे, उद्योजक उदय माने, दिलीप लबडे, संदीप उमाप, उद्योजक बालू मखरे, रमेश आप्पा मखरे, सुयोग धस सर, यशवंत पोटे, जितेंद्र पाटोळे, श्री. आरडे मेजर, बाळा काळे, दिपक मखरे यांच्यासह अनेक शंभूप्रेमी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यंदाची छत्रपती संभाजी महाराज जयंती भव्य, दिव्य आणि ऐतिहासिक पद्धतीने साजरी करण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

# एस.डब्ल्यू.एफ. पाणीमापक यंत्रणेला १५ दिवसांत परवानगी द्या


### उच्च न्यायालयाचे आदेश । भंडारदरा धरणाच्या पाणी वाटपातील अनियमिततेवर न्यायालयाची कठोर भूमिका

**कोपरगाव । वीरभूमी–**

भंडारदरा धरणाच्या पाणी वाटपातील बेसुमार चोरी आणि नादुरुस्त पाणीमापक यंत्रणांबाबत उच्च न्यायालयाने राज्य शासनाला कठोर निर्देश देत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एस.डब्ल्यू.एफ. (Surface Water Flow) पाणीमापक यंत्रणेला १५ दिवसांच्या आत परवानगी देण्याचे आणि त्यानंतर एका महिन्याच्या आत ही यंत्रणा पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे आदेश राज्य शासनाला दिले आहेत. तसेच, भंडारदरा धरणाच्या पाणी लेखापरीक्षण करून नव्याने शपथपत्र दाखल करण्याचेही निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

भंडारदरा धरणावर कालव्यांच्या माध्यमातून सुमारे ५७ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. या धरणाचे बांधकाम १९१८ मध्ये सुरू होऊन १९२६ मध्ये पूर्ण झाले असून त्याची पाणी साठवण क्षमता सुमारे ११ टीएमसी आहे. धरण दरवर्षी जवळपास पूर्ण क्षमतेने भरत असले तरी वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि शेतीचे शहरीकरण यामुळे पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात बदलला आहे. परिणामी, सिंचन क्षेत्रात घट झाली आहे.

बोगस पाणी वाटप संस्था, बंद पडलेले औद्योगिक कारखाने तसेच राजकीय हस्तक्षेपातून तयार झालेल्या बंद सोसायट्यांना पाणी परवाने देऊन मोठ्या प्रमाणात पाणी चोरी होत असल्याचे निळवंडे कालवा कृती समितीने माहिती अधिकारातून उघड केले होते. या संदर्भात शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे व युवराज औताडे यांच्या माध्यमातून ॲड. अजित काळे यांनी उच्च न्यायालयात याचिका (क्र. ६८०७/२०२१) दाखल केली होती.



या याचिकेत भंडारदरा धरणाच्या पाण्याचे ऑडिट करणे, बंद संस्थांचे पाणी परवाने रद्द करणे, शासनाच्या ४ ऑगस्ट १९८९ च्या जी. आर. नुसार पाणी वाटपाचे नियोजन करणे तसेच प्रत्येक तालुक्याच्या सुरुवातीला एस.डब्ल्यू.एफ. पाणीमापक यंत्रणा बसवून ती कार्यान्वित करणे, अशा मागण्या करण्यात आल्या होत्या.

दरम्यान, शासनाने दाखल केलेली शपथपत्रे अपुरी असल्याचे निदर्शनास आल्याने न्यायालयाने याची गंभीर दखल घेतली. ॲड. अजित काळे यांनी न्यायालयात मांडले की, एस.डब्ल्यू.एफ. यंत्रे अनेक वर्षांपासून बंद आहेत आणि शासनाने कार्यान्वित संस्थांची संपूर्ण माहिती सादर केलेली नाही. तसेच धरण पूर्ण भरत असूनही शेतकऱ्यांना योग्य प्रमाणात पाणी मिळत नाही व कालव्यांची दुरुस्तीही होत नसल्याचे त्यांनी नमूद केले.

या युक्तिवादानंतर न्या. नितीन सूर्यवंशी आणि न्या. वैशाली जाधव-पाटील यांच्या खंडपीठाने राज्य शासनाला तीन आठवड्यांच्या आत एस.डब्ल्यू.एफ. यंत्रणांच्या सद्यस्थितीबाबत नव्याने शपथपत्र दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच १५ दिवसांत परवानगी देऊन पुढील एका महिन्यात ही यंत्रणा पूर्णपणे सुरू करण्याचे निर्देश दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी जून २०२६ मध्ये ठेवण्यात आली आहे.

दरम्यान, ॲड. अजित काळे यांनी एस.डब्ल्यू.एफ. मीटरविषयी माहिती देताना सांगितले की, Surface Water Flow Meter किंवा Standing Wave Flume ही पाण्याचा प्रवाह मोजणारी यंत्रणा असून कालव्यामधून वाहणाऱ्या पाण्याचे प्रमाण (क्युसेक) अचूक मोजण्यासाठी तिचा उपयोग होतो. यामुळे पाणी वितरणाची पारदर्शकता वाढते आणि पाणी चोरी तसेच अपव्ययावर नियंत्रण ठेवता येते.

मात्र, भंडारदरा धरणाच्या लाभक्षेत्रात बंद पडलेल्या संस्थांच्या नावावर पाणी वापर दाखवून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. शासनाने अपूर्ण माहिती देऊन पाणी चोरीला संरक्षण दिल्याचा आरोप करत न्यायालयाच्या आदेशामुळे या अन्यायाला आळा बसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या निर्णयामुळे श्रीरामपूर तालुक्यासह लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, सचिव रूपेंद्र काले, तालुकाध्यक्ष युवराज जगताप आदींनी न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# सुविधेचा आभाव तरी बाजार कर वसुली जोरात

## पाथर्डी आठवडे बाजारात मूलभूत सुविधांच्या अभावामुळे शेतकऱ्यांची परवड । ४० अंशांवरील तापमानामुळे विक्रीत मोठी घट

**● पाथर्डी । वीरभूमी –**
पाथर्डीच्या आठवडे बाजारात आज तीव्र उष्णतेच्या लाटेचा मोठा फटका बसला. रखरखत्या उन्हात ग्राहकांच्या प्रतीक्षेत माल घेऊन बसलेले शेतकरी अक्षरशः जगण्यासाठी संघर्ष करताना दिसत आहेत. त्यांच्यासाठी ना निवाऱ्याची व्यवस्था आहे, ना पिण्याच्या पाण्याची सोय. मात्र ठेकेदारामार्फत बाजार पावतीची वसुली मात्र सुरूच असल्याचे चित्र दिसून येत आहे.

आज पाथर्डी शहराचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले होते. परिसरातील गावांमधून शेतकरी बाजाराच्या खर्चापुरता भाजीपाला व कडधान्य विक्रीसाठी येथे आणतात. शेवगाव, नगर, आष्टी, शिरूर, नेवासे या भागांतील व्यापारी देखील या बाजारात आवर्जून सहभागी होतात.

पालिका कार्यालयासमोर मोठा बाजारतळ असून एका बाजूला उपजिल्हा रुग्णालय, तर दुसऱ्या बाजूला नगर व माणिकदौंडी रस्त्याला जोडणारा दुपदरी काँक्रीट रस्ता आहे. रोजच्या बाजारासोबतच फळ व्यापारी, बेकरी व हलवाई व्यावसायिक आपापले स्टॉल लावतात. मात्र ज्या शेतकऱ्यांसाठी हा बाजारतळ उभारण्यात आला, तेच शेतकरी सकाळी साडेसातपासून संध्याकाळी सातपर्यंत उघड्यावर बसून माल विकताना दिसतात. काही जण रिकामे पोते टाकून त्यावर बसूनच दिवस काढतात.

सध्या बाजारात कांदा, कोथिंबीर, गवार, चवळीच्या शेंगा, शेवग्याच्या शेंगा, वांगे, बीट, टोमॅटो, काकडी, हिरवी मिरची या भाजीपाल्याला अत्यल्प दर मिळत आहेत. डाळिंब, टरबूज, चिकू यांसारख्या फळांचीही स्थिती फारशी वेगळी नाही. एका बाजूला भाव नाहीत, तर दुसऱ्या बाजूला उन्हामुळे ग्राहकच नसल्याने विक्री ठप्प झाली आहे. दुपारी १२ ते सायंकाळी ५ या वेळेत बाजारपेठ पूर्णपणे ओस पडते.

पूर्वी जिल्ह्यातील मोठ्या बाजारांपैकी एक म्हणून ओळख असलेला पाथर्डीचा बाजार आता ओसरत चालल्याचे चित्र आहे. आजच्या घडीला गुरुवारी भरणारा तिसगावचा बाजार अधिक मोठा भरतो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

एक हृदयस्पर्शी उदाहरण म्हणजे पूर्व भागातील काही शेतकरी कोथिंबीर, वांगी व गवारीच्या शेंगा घेऊन बाजारात आले. गावातून येण्यासाठी ३० रुपये भाडे, बाजार पावती १० रुपये, पाण्याची बाटली २० रुपये, चहा २० रुपये-असा खर्च झाला. घरून आणलेल्या भाकरी-चटणीवर त्यांनी दिवस काढला. मात्र दुपारपर्यंत केवळ ५५ रुपयांचीच विक्री झाली. उरलेला माल विकला गेला नाही, तो फेकून द्यावा लागतो. परतीसाठी एस.टी. मिळाली तर १० रुपयांत प्रवास, अन्यथा रिक्षासाठी पुन्हा ३० रुपये खर्च.




महिला शेतकरी सांगतात की, पहाटे उठून भाजी तोडणे, घरकाम करणे, दिवसभर उन्हात बसणे आणि संध्याकाळी पुन्हा घरची कामे-या चक्रात त्यांचे आयुष्य अडकले आहे. भाकरी तर करतो, पण खायचं काय? असा त्यांचा वेदनादायक सवाल आहे.

पालिकेकडून बंदिस्त भाजी बाजार, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सोय, मोकाट जनावरांपासून संरक्षण अशा मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. सध्या उष्णतेच्या लाटेमुळे सर्वच घटक हतबल झाले असून बाजारपेठेत मंदीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तीव्र उन्हामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी झपाट्याने खाली जात आहे. भूपृष्ठावरील पाणीसाठेही आटत चालले आहेत. पाणीटंचाई, गॅस टंचाई आणि उष्णतेची तीव्रता लक्षात घेता लग्नसोहळे साध्या पद्धतीने पार पाडण्याची गरजही व्यक्त होत आहे.

# संजीवनी इंजिनिअरींगच्या आठ विद्यार्थ्यांना नोकरी

## ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामुळे घडते आहे किमया

**● कोपरगाव । वीरभूमी –**
संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या आठ विद्यार्थ्यांची विवीध कंपन्यात आकर्षक वेतनावर नोकरीसाठी निवड झाली. विध्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या सत्रात संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज मध्ये विविध नामांकीत कंपन्यांचे अधिकारी येऊन विध्यार्थ्यांच्या मुलाखती घेत असतात. विद्यार्थ्यांची दर्जेदार तयारी, कौशल्यपूर्ण प्रशिक्षण आणि उद्योगाभिमुख दृष्टिकोन यामुळे ते निवडीसाठी पात्र ठरत असून, अंतिम निकालाच्या अगोदरच नोकरी मिळण्याचे त्यांचे स्वप्न साकार होत आहे. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांत समाधानाचे तसेच आनंदाने वातावरण निर्माण होते आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या नियोजबध्द कामगीरीमुळे हि किमया घडते आहे.

> मी राहुरी तालुक्यातील शेतकऱ्यांचा मुलगा आहे. संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज या ऑटोनॉमस संस्थेत मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगला प्रवेश मिळाला व तेथेच माझी करिअरच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. माझा अंतिम वर्षाचा प्रोजेक्ट 'फ्लोअर क्लिनिंग रोबोट युझिंग सोलर एनर्जी' हा होता. या प्रोजेक्टचा उपयोग मला रोबोवेल्ट सिस्टीम या कंपनीत रोबोटीक्स इंजिनिअर निवडीसाठी झाला. संजीवनीमुळे माझे व माझ्या आई वडीलांचे स्वप्न पूर्ण झाले, याचा मला मनस्वी आनंद आहे. सध्या आटोमेशनचा जमाना आहे. भविष्यात येथे मिळालेल्या नोकरीमुळे माझे भविष्य उज्वल आहे.
>
> **– प्रदिप जाधव,** विद्यार्थी

या निवड झालेल्या विद्यार्थ्यांत फॉरेसिया इंडिया लिमिटेड कंपनीने मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या एकता मनोज आहेर हिची नोकरीसाठी निवड केली. आरकेएस इंजिनिअरींग सर्विसेस कंपनीने सिव्हिल इंजिनिअरींगच्या गायत्री योगेश चौधरी, श्रध्दा माणिक दिघे, दाक्षयाणी विक्रम थोरात व चैताली बाळासाहेब थोरात यांची निवड केली. मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या मयुर चंद्रकांत डांगे याची हाय टेक रडिएटर्स, मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या प्रदिप अनिल जाधव याची रोबोवेल्ट सिस्टीम प्रा. लि. कंपनीने तर सिव्हील इंजिनिअरींगच्या जय महेश भोसले याची डिझाईन स्टुडिओने निवड केली.

संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे व कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांनी या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

# अकोले तालुक्यात ग्रामपंचायत पोटनिवडणुकांचे निकाल जाहीर; पाडोशीच्या सरपंचपदी गोरक्ष साबळे विजयी

## राजूर, समशेरपूरसह विविध गावांत चुरशीच्या लढती । अनेक ठिकाणी बिनविरोध निवड

**● अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांचे निकाल आज बुधवारी जाहीर करण्यात आले. या निवडणुकांमध्ये राजकीय दृष्ट्या जागृत समजल्या जाणाऱ्या गावांचा समावेश होता. पाडोशी गावच्या सरपंच पदाच्या थेट पोटनिवडणुकीत गोरक्ष येसु साबळे हे विजयी झाले आहेत.

तालुक्यातील राजूर, समशेरपूर, पाडाळणे, कोंभाळणे, पाडोशी या ग्रामपंचायतींमधील काही जागांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला होता. त्यानुसार काल मंगळवारी या जागांसाठी मतदान शांततेत पार पडले. आज बुधवारी सकाळी दहा वाजता अकोले तहसील कार्यालयात मतमोजणीस सुरुवात झाली.

पाडोशी या एकमेव गावातील अनुसूचित जमाती वर्गाच्या सरपंच पदासाठी पाच उमेदवार रिंगणात होते. गोरक्ष येसु साबळे यांनी २६४ मते मिळवत विजय संपादन केला. त्यांनी प्रतिक बाळू साबळे (११८ मते), रामदास मधू भांगरे (४७), लक्ष्मण किसन भांगरे (२४०) व अरुण दिलीप साबळे (१६२) यांचा पराभव केला.

आजी-माजी आमदारांचे गाव असलेल्या राजूर ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीत माजी सरपंच गणपतराव देशमुख यांचे चिरंजीव व भाजप युवा मोर्चाचे राजूर शहराध्यक्ष अक्षय देशमुख यांनी ४८५ मते मिळवत चांगल्या मताधिक्याने विजय मिळविला. त्यांनी विठ्ठल रावजी देशमुख (२०९ मते) यांचा पराभव केला.

समशेरपूर ग्रामपंचायतीतील अनुसूचित जाती महिला वर्गाच्या जागेसाठी झालेल्या निवडणुकीत लता दीपक जगताप यांनी ३४६ मते मिळवत मीरा दादा साळवे (२३२) यांचा पराभव केला. तर बाबुराव निवृत्ती मेंगाळ हे बिनविरोध विजयी झाले.

कोंभाळणे ग्रामपंचायतीतील अनुसूचित जमाती महिला जागेसाठी अत्यंत चुरशीची लढत झाली. यात मनिषा सीताराम बांबळे यांनी १३८ मते मिळवत सीता मधुकर बांबळे (१२४) यांचा १४ मतांनी पराभव करत विजय मिळविला.

पाडाळणे ग्रामपंचायतीतील अनुसूचित जमाती महिला जागेसाठी झालेल्या निवडणुकीत मीनाक्षी मारुती शेंगाळ यांनी २६७ मते मिळवत अश्विनी मछिंद्र बगाड (३२) यांच्यावर एकतर्फी विजय मिळविला.

तसेच वांजुळशेत/पुरुषवाडी ग्रामपंचायतीत सविता काशिनाथ चिखले, पिंपळदरावाडी येथे शैला पोपट भांगरे, घोटी ग्रामपंचायतीत प्रियंका सुनील डावखर, अंजना देविदास भांगरे, काशिनाथ सोमा बांबळे व सुप्रिया दत्तात्रय घोडे या उमेदवार बिनविरोध निवडून आल्या.

अवघ्या तासाभरात सर्व निकाल जाहीर करण्यात आले. विजयी उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे व निवासी नायब तहसीलदार किसन लोहारे यांनी काम पाहिले.

# शेटे वस्ती, वाखुरे वस्तीला तात्काळ वीजपुरवठा द्या

## नगरसेविका मंगल सोनटक्के यांची पाथर्डी पालिकेला निवेदन

**● पाथर्डी । वीरभूमी–**
पाथर्डी नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ४ मधील शेटे वस्ती, वाखुरे वस्ती तसेच परिसरातील इतर भागांमध्ये अद्याप वीजपुरवठ्याची सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नगरसेविका मंगल सोनटक्के, नगरसेवक सुभाष बोरुडे आणि नागरिकांच्या वतीने नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

नगराध्यक्षांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संबंधित भागात वीजपुरवठा नसल्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अंधारामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सध्याच्या दमट हवामानामुळे साप व इतर विषारी प्राण्यांचा धोका वाढला असून चोरीसारख्या घटनांची भीतीही नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.



या पार्श्वभूमीवर संबंधित भागात तात्काळ वीजपुरवठा सुरू करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

यावेळी नगरसेविका मंगल पांडुरंग सोनटक्के, नगरसेवक सुभाष बोरुडे, काशिनाथ शेटे, शुभम शेटे, कुणाल शेटे, विशाल शेटे, प्रताप शेटे, शुभम भापकर यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# पाथर्डीतील मतिमंद विद्यालयात माधव बाबा यांच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त महेश रोकडे परिवाराकडून मिष्ठान्न भोजन वाटप

**● पाथर्डी । वीरभूमी –**
मोहरी रोडवरील नवोदय ग्रामीण नागरी विकास प्रतिष्ठान व सांस्कृतिक मंडळ पाथर्डी संचलित निवासी मतिमंद विद्यालय व मतिमंद मुलांचे बालगृह येथे शेवगाव येथील महेश रोकडे परिवाराच्या वतीने सद्गुरु शंकर महाराज भक्ती मठाचे मठाधिपती परमपूज्य माधव बाबा यांच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन देण्यात आले.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष नगरसेवक निलेश रोकडे होते. प्रमुख उपस्थितीत महेश रोकडे, योगेश रोकडे, मुख्याध्यापक सचिन तरवडे, प्रताप निर्हाळी, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष नगरसेवक निलेश रोकडे म्हणाले की, परमपूजनीय माधव बाबा यांना वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा. त्यांच्या आशीर्वादाने आज या ठिकाणी निवासी मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन देण्यात आले. तू देता रह, मैं देता रहूंगा; तू खिलाते रह, मैं पुराता रहूंगा या त्यांच्या वचनाचा प्रत्यय जीवनात वारंवार येतो. बाबांचे आशीर्वाद सतत मिळत राहोत, तसेच त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली.

शाळेचे मुख्याध्यापक सचिन तरवडे म्हणाले की, प. पू. माधवबाबा यांना दीर्घायुष्य लाभो, ही मोहटादेवी चरणी प्रार्थना आहे. बाबा दरवर्षी दिवाळीला या शाळेतील विद्यार्थ्यांना ब्लँकेट व दिवाळी फराळ वाटप करतात. आज त्यांच्या भक्त महेश रोकडे यांनी विद्यार्थ्यांना स्नेहभोजन दिले. बाबा आणि भक्तांचे प्रेम असेच विद्यार्थ्यांना मिळत राहो, अशी त्यांनी भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितेश मेघनर यांनी केले तर आभार संभाजी झावरे यांनी मानले.